# स्नेहफुलोरा

## महाराष्ट्र स्नेह मंडळ इंडियाना
(MSMI)

## गणेशोत्सव

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभः।
निर्विघ्नं कुरुमे देव सर्व कार्येषु सर्वदा ।।

गणपती बाप्पा मोरया



गणपती बाप्पा मोरया

अंक २
भाद्रपद शके १९४५ * सप्टेंबर २०२३

स्नेहफुलोरा (MSMI)

# अनुक्रमणिका

**ब्लॉग (Blog)**

अमेरिकेशी माझी ओळख
मसालेभात

**कविता संग्रह (Poem)**

Air Journeys
सोहळा श्रद्धेचा

**खाद्ययात्रा (Recipes)**

चॉकलेट करंजी
Sugarfree Protein Ladoo

**कला विभाग (Art Corner)**

Painting by: Vidya Deshmukh
Crochet Work by: Prabhat Ginde

**बाल विभाग (Kids Corner)**

Drawing by: Parnika Sapre
मराठी शाळा (Carmel)
मराठी शाळा (Fishers)
मराठी शाळा (Zionsville)

**पालखी प्रकल्प (Palkhi Project)**

Palkhi Making

**MSMI Administration**



↑

# ब्लॉग
# (Blog)



## अमेरिकेशी माझी ओळख

अमेरिकेबद्दल खूप ऐकलं होता. मोठ्ठा देश . भरपूर श्रीमंती. सुपरपॉवर देश. अस बरंच काही. माझं मास्टर्स चं शिक्षण इंग्लंड ला झालं असल्यामुळे 'abroad ' काय देश आहे माहिती होतं. पण बरोबरचं मनहतात कि सगळ्या देशांची एक अशी आयडेंटिटी असते. आता मला इकडे राहून 2 महिने झाले. नक्की काय 'आयडेंटिटी' हे अजून पूर्ण कळलं नाही पण मला वाटतं बऱ्यापैकी अमेरिका मला कळली आहे. इकडची लोक, त्यांची राहण्याची पध्दत, त्यांचे आवडणारे हॉबीएस, पार्क्स, टिपिकल अमेरिकन फूड आणि बरंच काही. भारताची आठवण नक्कीच येते. का नाही येणार! एका इंडियन ला नक्कीच त्यांच्या देशाची आठवण येईल. पण मला अमेरिका रोज नव्याने कळते. इकडचा इंडिपेडन्स, सगळ्या गोष्टी स्वतानी कर्ण, ड्रायविंग शिकणं हे सगळं मला नवीन वाटलं. असा वाटलं खूप डिपेंडेंट राहू हे सगळं शिकलं नाही तर.

आयुषचा एक नवीन अर्थ कळला इकडे येऊन. जगात किती गोष्टी शिकण्यासारख्या आहेत हे उमजून आलं. नक्कीच आधी जो माणूस भारतातून अमेरिकेत येतो तेहवा भांबावून जातो. काय काय आणि किती शिकू असं होतं. इकडच्या लोकांचा कॉन्फिडन्स बघून असं वाटतं कि आपण होऊ कि नाही एवढे कॉन्फिडन्ट. मला अजून एक मजेशीर वाटलं कि इकडे फूड 'स्मॉल size' चं कधीच नास्ता. मोठ्ठा कॉके चं ग्लास, ना संपणारा इसक्रीम चा गोळा हे बघून एकदम मन अचंबित झालं. एवढा खातात हि लोकं? Bapp रे ! पॉट नाही बिघडतं ? असे सगळे प्रश्न विचारून मी माझ्या नवऱ्याला अगदी भंडावून सोडलं होतं!. हो खूपच फनी आहे पण सत्य आहे. इकडच्या पार्क्स नि माझं मन खुश होतं. घनदाट जंगले, कॅम्पिंग, lake side ट्रिप्स नि मस्त वाटलं. खरंच !

मी nature lover असल्यामुळे मला हे सगळं खूप आवडलं. इकडच्या घरांची structure, garage अँड बॅकयार्ड हे सगळं सुपर आहे !! घरी बसून इकडे माणूस खूप काही करू शकतो . गार्डेनिन्ग शिकू शकतो .आपल्या घरातल्या झाडांची निगा नीट राखू शकतो. Mind-blowing आहे खरंच!. इकडे सगळ्या जागा खूप लांब आहेत . हे बघून अगदी चकित झाले मी. Isolated homes मला वाटतं इकडे खूप कॉमन आहेत. सगळ्यांना त्यांची privacy हवी असते. मला वाटतं अजूनही शिकल्ये मी. अमेरिकन एकसेन्ट पण वेगळाच वाटलं. सुपर फास्ट बोलणं. कसं शिकू? हो पण इवेन्टउल्ली सगळ्यांना catch up कराव्या लागतातच ह्या गोष्टी I guess!. जेट लाग एवढा झालं नाही पण इकडे सगळ्या स्टेट्स च्या वेळा वेगळ्या असतात हे ऐकून खूप वेगळाच वाटलं. आपल्या इंडिया मध्ये फक्त एक वेळ. मुंबई मध्ये तीच आणि दिल्ली मध्ये पण. सोप्पं आहे! इकडे माणसाला कॉन्टॅक्ट कराच्या आधी वेळ बघावी लागतं असेल. ईस्ट कोस्ट आणि वेस्ट कोस्ट. अजून एक वेगळेपण.

अमेरिकेत बाकी स्टेट्स मध्ये ट्रॅव्हल केला तेहवा मज्जा आली. डेल्टा एरलाईन्स नि ट्रॅव्हल करायचा एक छान एक्सपेरियन्स मिळाला. डेनवर, मिनीपोलिस, चिकागो अश्या स्टेट्स बघायला मिळाल्या. मस्त वाटलं बघून हे अमेरिकेचं वेगळेपण. कधी कधी वाटतं इंडियातील life सोप्पं आहे. आपली लोकं, जेवण बनवून देणारे maid servants , आपली फॅमिली, फ्रेंड्स आणि ऑफिस colleagues हे सगळं इंडियातचं आहेत. पण इकडे लिफे टफ असलं तरी opportunities पण असतीलच ! पुस्तकात वाचलं तसंच आहे अमेरिका थोडाफार. American novels मध्ये होतं तसंच बरंच काही दिसलं इकडे. मला अमेरिकन culture पूर्णपणे कधी कळेल माहिती नाही पण वेगळं नक्कीच आहे. रोज एक नवीन गोष्ट शिकायला मिळते. कधी आधी वेगळचं वाटतं हे culture . पण इ थिंक मी blend इन होण्याचा पूर्ण प्रयत्न करतेय !

**Rasika Anupam Thatte**

# मसालेभात

'मसालेभात' ह्या एका शब्दाने गाडी सुरु होते आणि Harry Potter मधल्या platform number 9 and 3/4 th प्रमाणे ती ह्या जगाला सोडून एका वेगळ्याच अद्‌भूत जगतात गायब होते.

"हरी ओम केशवाय नम: नारायणाय नम: माधवाय नम: "..गुरुजीं पूजा सांगत आहेत. बाबा सोवळे नेसून पूजा करत आहेत. बाबा आणि गणपती दोघेही फार गोड दिसत आहेत. सगळे घर लख्ख होऊन बसले आहे. एकी कडे आदल्या दिवसापासून आलेली मंडळी अन्हिकं उरकत आहेत. लिला आजी दूर्वा फुलांचे हार करत बसली आहे. मनू आणि मी उगीच लूडबूड करत बसलो आहोत. आदल्या दिवशी खवलेल्या नारळाचे सारण घरभर मोदकांची नांदी देत आहे. आत्या पुजेसाठी काय हवे नको बघते आहे. आई साबूदाण्याची खिचडी, चहा काॅफी सगळ्यांना मिळाली का पहाते आहे. हे सगळे आटोपते ना आटोपते तो नैवेद्याच्या स्वयंपाकाची तयारी सुरु आहे.

आजी ताक करत आहे. काकू आजी काकड्या सोलते आहे. आत्या,सुरेखा काकू, सुषमा काकू, आई ला लागेल ती मदत करत आहेत. पण हेड शेफ मात्र आईच आहे. 😀मोदकाची उकड काढून झाली आहे. आता सगळ्या जणी मोदक करायला बसल्या, आत्या मला शिकवते आहे. लिला आजी च्या मोदकाला एकवीस कळ्या आहेत. दोन्ही काकू सुंदर मोदक करत आहेत. आई मधेच एखादा मोदक वळत आहे... दहा ठिकाणी व्यवधान असलेल्या आई चा मोदक तीला स्वत:लाच फारसा पसंत नाही पण ती श्रध्देने एखाद दोन तरी स्वहस्ते करत आहे.

हास्य विनोद गप्पा टप्पा सुरु आहेत. वृंदा काकू आली आहे. ती सारखी आईच्या मागे वहिनी काय करु काय करु म्हणते आहे. आई च्या मागे सावली सारखी फिरुन पडेल ते काम करते आहे. जमेल तसे पसरलेले स्वयंपाकघर आवरते आहे. आता सुशिला आजी पण आली ती आजी शी गप्पा गोष्टी करते आहे. येताना ती आठवणीने गणपतींचे चार दिवस खाता येईल असा चिवडा लाडू घेऊन आली आहे. राणी आत्याचा ड्रेस मला आवडतो, ती काही वेगळेच छान कपडे घालते. श्रीराम काका आई चा लाडका, तोही आल्या आल्या वहिनी ची चौकशी करतो आहे. एकीकडे वाफाळलेले मोदक काढून ठेव, मधेच चहा चे आधण ठेव, मधेच साराला फोडणी दे, कुणाला कोथिंबीर चिरायला सांग. असे करत सगळे मार्गी लागल्यावर मगाशी भिजत घातलेले तांदूळ, ताटात काढून ठेवलेले काजू, अख्खा गरम मसाला, गोडा मसाला, वाटलेला हिरवा मसाला, मटार दाणे, तोंडली ह्यांच्याकडे आई मोर्चा वळवते..." गजानना गणराया हातून चांगले होऊदे रे बाबा ", असे म्हणून मोठाल्या पातेल्यात तापत ठेवलेल्या तेलात एकेक जिन्नस जमा होऊ लागतो आणि मोदकांना मागे टाकत घर मसाले भाताच्या सुगंधाने भरुन जाते. मंडळींच्या भुका पुन्हा जाग्या होतात.

"भाऊ,वहिनी म्हणाली आरती ची तयारी करा नैवेद्य तयार आहे" असा निरोप चंदू काका घेऊन येतो.

"सुखकर्ता दु:खहर्ता ने सुरु झालेली आरती.. गणपती बाप्पा मोरया चा गजर करत संपते. आई ने घरी केलेले पेढे, राजा काका ने पार्ल्याहून आणलेली बर्फी, अशोक काकांचे सप्र्यांकडचे मोदक अशी बाप्पा च्या निमीत्ताने आमची चैन होते. नैवेद्याची ताटे येतात. मोदकांच्या ताटा बरोबर पूर्ण जेवण वाढलेले चांदीचे ताट त्यात तो आई चा वाफाळता मसालेभात.
बाप्पा गालातल्या गालात हसतो आई ला शाब्बासकी देतो.

अंगत पंगत होते. मी, वरदा, मनू, अमिता आम्ही लिंबू टिंबू पदार्थ वाढतो. लहान मुलांच्या पंगतीत आम्ही आणि मोठ्यांच्या पंगतीत सगळी काका मंडळी जेवायला बसतो. आत्या काकूंच्या बरोबरीने बाबा पण काय हवे नको ते पहातात. पहिल्या वरण भाता नंतर ताटात येणारा तो वाफाळता मसालेभात, वर तुपाची धार आणि खोबरे कोथिंबीर... आहा.. मंडळी तोंडभरून आई च कौतूक करतात. मोदकाच्या बरोबरीने मसाले भाताचा आस्वाद घेतला जातो.

जो तो आई ला म्हणतो, "वहिनी भात नेहमी प्रमाणे उत्तम". आई च्या बरोबरीने मी सुखावते. तीचे मला खूप कौतूक वाटते. शेवटची पंगत सगळ्या काकू, आत्या, आज्जी आई बाबा ह्यांची. आम्ही मुली त्यांना काय हवे नको ते पहातो. दमलेली आई नीट जेवत नाही असे मला वाटते, सगळ्यांना जेवताना पाहूनच तीचे पोट भरते बहूदा. ताटावरुन उठताना ती न चुकतां "अन्नदाता सुखी भव म्हणते."

सगळे आटोपून जेव्हा आई निवांत बसते तेव्हा मी नी मनू तीला बिलगून लाड करतो. "सगळे खूप छान झाले आई तू उगीच काळजी करतेस ",असे म्हणून तीचे कौतूक करतो. आई म्हणते " त्या गजानना ला काळजी."

खरे पाहिले तर मसाले भात लग्नातर्यातही खूप चविष्ट असे त्याकाळी. मी ही आता माझ्या स्वयंपाकघरात तो तंतोतंत आई च्या शिकवणीनुसार करते पण त्याला आईच्या हातची चव नाही . सगळे साहित्य आणि कृती तीच असली म्हणजे पदार्थ तसाच होईल असे नाही त्यात तो गजानन अन् ती अन्नपूर्णा माऊली असावी लागते.

**अपर्णा निनाद भावे**

स्नेहफुलोरा
(MSMI)

↑

# कविता संग्रह
# (Poem)

महाराष्ट्र स्नेह मंडळ इंडियाना

**Air Journeys**

Take us as high as clouds will let you,

let's hug the sky together and feel more blissful and sane.

To feel the cozy blankets of cloud wrapped around,

bustling wind waving by to say " Here we meet again".

Lead us to the way where happiness beacons,

a state where moments of beauty and wonder together etch our memories like shiny rays, and where the smiles spread.

Show us the places where big miracles are made, in front of which our tiny eyes weep in gallor not pain, where God put time to sketch and paint.

Cool breeze, palm trees, desert or rain

we would love to experience it together all over again.

Steps, thy, lead us onto where the memories are made,

in a valley, mountain or land just plain.

I will hold the wonder in my heart and then pack my suitcase until we meet again.

**Aditi Sarpotdar**

## सोहळा श्रद्धेचा

दोन हस्तक तिसरे मस्तक
एवढे पुरते तुला
आई नेहमी म्हणते.
तरी आम्ही करतोच सोहळा
तुझ्या आगमनाचा
आम्ही करतो की ...तूच घेतोस करवून ?
मग भेटावेच लागते आम्हाला
तू होतोस निमीत्त.
मग कोण कुठचे आम्ही
एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून
उभे ठाकतो शेजारी
हातात हात येतात.
शब्दांना सुरांचे स्वप्न पडते
वाद्यांना ताल सापडतो
पाऊले लयीत पडतात
कल्पना आकार घेतात
प्रतिमेला प्रतिभा लाभते
अन्नपूर्णा प्रसन्न होते
आणि चैतन्याने वातावरण भारते
चौसष्ठ कलांचा अधिपती तू
तूझ्यावर आमची भिस्त
देवाक काळजी म्हणत आम्ही ही निर्धास्त
कारण कार्य सिद्धीस न्यायला
तू समर्थ आहेस

**अपर्णा निनाद भावे**

स्नेहफुलोरा
(MSMI)

↑

# खाद्ययात्रा
# (Recipes)



महाराष्ट्र स्नेह मंडळ इंडियाना

## चॉकलेट करंजी

**साहित्य:**
दोन कप किसलेले नारळ
अर्धा कप कट काजू आणि बदाम
एक चौथा कप melted चॉकलेट किंवा Nutella चॉकलेट
ब्रेडचे स्लाइस

**पाककृती:**
हलके तपकिरी रंगाचे होईपर्यंत नारळ आणि बदाम भाजून घ्या.
एक वाडगा मध्ये काढा आणि पूर्णपणे थंड होऊ द्या.
त्यात नुटेला चॉकलेट मिक्स करा.
चांगले मिक्स करावे.
ब्रेड स्लाइसेस ला गोल आकारात कापा.
त्यात नारळाचं सारण भरून घ्या.
ब्रेड स्लाइस ला कडा वर पाणी लावा, त्याला करंजीचा आकार द्या.
पॅनमध्ये दोन ते तीन टेबलस्पून बटर गरम करा आणि सर्व करंजया भाजून घ्या.

चॉकलेट करंजी तयार

नवीन पाककृती करिता, कृपया माझ्या YouTube चॅनेलचा संदर्भ घ्या.

**चॅनेल लिंक:**
https://youtube.com/@Amazingkitchen1188?si=Z7ze4M1P5MGIC0KB

**श्रद्धा गोडबोले**

## Sugarfree Protein Ladoo

↑

**INGREDIENTS:**

Pitted dates 500gm
Peanuts ½ cup
Chopped Almonds ½ cup
Chopped Walnuts ½ cup
Chopped Pistachios ¼ cup
Chopped Cashews ¼ cup
Flax seeds 1 cup
Sesame seeds ½ cup
Pumpkin seeds ½ cup
Melon seeds ½ cup
Sunflower seeds ½ cup
Ghee 2 tbsp
Cardamom powder 1 tsp

**How to make:**

Dry roast peanuts.
Dry roast Flax seeds.
Dry roast Sesame seeds.
Dry roast Pumpkin, Melon and Sunflower seeds together.
Now add 2 tbsp ghee and roast all Chopped nuts together.
Grind all roasted nuts and seeds into fine powder.
Grind dates.
Now mix nut n seeds powder, grinded dates, and cardamom powder.
Shape them in ladoo.

Note: This recipe will give you approximately 15-18 g of protein/ladoo.

**Mrs. Swati Lotake**

# कला विभाग
# (Art Corner)

↑



Painting by: Vidya Deshmukh

↑



Crochet Work by: Prabhat Ginde

↑

# बाल विभाग
# (Kids Corner)



↑




Drawing by: Parnika Sapre

↑

# मराठी शाळा (Carmel)



# मराठी शाळा (Fishers)



# मराठी शाळा (Zionsville)



स्नेहफुलोरा
(MSMI)

↑

# पालखी प्रकल्प
# (Palkhi Project)

महाराष्ट्र स्नेह मंडळ इंडियाना









↑

## Executive Committee 2023

President: Chitra Sapre:

Vice President: Trupti Binwade

Secretary: Sameer Talar

Treasurer: Sanjyot Deolalikar

## Extended Committee 2023

Sanchita Kulkarni
Prajakta Gaokar
Santosh Binvade
Yugandhar Yawatkar
Vrishali Karande Dighe
Tejas Hajirnis
Dhananjay Kulkarni
Gauri Kulkarni
Sangeeta Bajaj

**SnehFulora**
Shraddha Godbole




SWAR INDY

*Gaata rahe Hamara Dil*

स्नेहफुलोरा

(MSMI)

↑



महाराष्ट्र स्नेह मंडळ इंडियाना